जात प्रमाणपत्र तपासणी समितीच्या निर्णयाविरुद्ध विभागीय आयुक्तांकडे अपिल, विभागीय आयुक्तांनी जाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या निर्णयाविरुद्ध अपिलाचा निर्णय दिल्याप्रकरणी तसेच जाती प्रमाणपत्र तपासणी समितीने दिलेल्या प्रकरणी शासनास अंतिम निर्णय देण्याचा अधिकार रद्द करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सीबीसी १०९६/सीआर १२४/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२. दिनांक : २३ जुलै, १९९६.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र. सीबीसी १६८४/गोप. ५९२/(१९९९)/बीसीडब्ल्यू-५, दिनांक १४ मार्च, १९८५ व १६ ऑक्टोबर, १९८५.

२) शासन शुद्धीपत्र, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी १६९६/२२१/मावक-५ दिनांक २५ नोव्हेंबर, १९९४.

३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी १०९६/सीआर-४८/मावक-५, दिनांक ३ जून, १९९६.

**शासन निर्णय :-** सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७६७/९३ सिव्हील अर्ज क्रमांक ५८५४/९४, कु. माधुरी पाटील विरुद्ध अप्पर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे व इतर यावर दिनांक २ सप्टेंबर, १९९४ रोजी निर्णय दिला त्या निर्णयाच्या वेळी दिलेल्या निदेशास अनुसरुन एखादी व्यक्ती अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गात असल्याचे जातीचे प्रमाणपत्र दिले असल्यास त्याबद्दलच्या कोणत्याही तक्रारीची जाती प्रमाणपत्र तपासणी समिती ज्या क्षेत्रातील असेल ती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती संबंधित दक्षता पथकामार्फत अशा तक्रारीची चौकशी करील व अशी तक्रार प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्यावर ६ महिन्यांपासून आत निर्णय घेईल. याबाबत जाती प्रमाणपत्र समितीचा निर्णय अंतिम राहील. अशी तरतूद शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी १०९६/प्र. क्र. ४८/मावक-५, दिनांक ३ जून, १९९६ मध्ये केली असल्यामुळे जातीच्या प्रमाणपत्राच्या संबंधाने जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाविरुद्ध विभागीय आयुक्तांच्या निर्णयाची व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयाची फेरतपासणी करण्याचा अधिकार शासनाकडे होता तो देखील रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स. नु. गावीत,
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**